सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**


थेट दूरध्वनी क्र. :- +९१-२२-२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:- +९१-२२-२२६२ ०११४
विस्तारित क्र. :- १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.))
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई-मेल :- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप-आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१


**क्रमांक पोउआ(प्रकटी)/जा.क्र. .१२११/२०२५** **दिनांक १५/०९/२०२५**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय, मुंबई.

विषय :– Best Detection of the Month July 2025 ‘‘उत्कृष्ट गुन्हे शोध’’ व Best Conviction of the Month July 2025 ‘‘उत्कृष्ट अपराधसिध्दी’’ पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे जुलै –२०२५ करीता ‘‘ **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** ’’ याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ)**

➢ **माहे जुलै – २०२५ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१) **पायधुनी पो.ठाणे**, परिमंडळ ०२, मुंबई गु.र.क्र. ६०१/२०२५ कलम ३०९(४), ३११, ३(५), ३५२, ३५१(३) भा.न्या. सं. सह कलम ३७ (१) (अ) १३५ म.पो.का.

२) **साकीनाका पोलीस ठाणे**, परिमंडळ–१०, मुंबई. गु.र.क्र.२९६/२०२५ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ कलम ८(सी) r/w २२(सी), ९(अ) r/w २५(अ), २९ सह भारतीय न्याय संहिता कलम १११.

**ब)**

➢ **माहे जुलै २०२५ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१) साकीनाका पोलीस ठाणे,परिमंडळ–१०, मुंबई गु.र.क्र २५८/२०१७, कलम ३७६(२)(I), ३७६(२)(N),३४२,५०६(२) भादवि सह कलम ४,६,८,१२ पोक्सो अधि. २०१२

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :–

दिनांक ११/०९/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे **जुलै २०२५** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

**(अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै २०२५ – ०२ गुन्हे**

| | | |
|---|---|---|
| ०१ | **पायधूनी पोलीस ठाणे**, परिमंडळ-२, मुंबई | **गु.र.क्र. ६०१/२०२५** कलम ३०९(४), ३११,३(५), ३५२, ३५१(३) भा.न्या.सं. सह कलम ३७(१)(अ)१३५ म.पो.का. |

**-: " चाकूचा धाक दाखवुन जबरी चोरी." :-**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :- नमुद गुन्हयात फिर्यादी हे १,३०० ग्रॅम वजनाची सोन्याची तारपाट (लगड) डिलेवरी करण्याकरीता जात असताना मुंबादेवी रोड, पायधुनी या ठिकाणी त्यांचा ओळखीचा इसम व एक अनोळखी इसम याने संगनमत करून फिर्यादीला चाकुचा धाक दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादीच्या ताब्यातील नमुद वर्णनचा माल जबरदस्तीने चोरुन नेला म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्री.पुर्ष्येद्र नाथु सिंग, १९ वर्षे, |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :- | एकुण १३०० ग्रॅम वजनाची पिवळया रंगाची सोन्याची तारपाट (लगड) अंदाजे किमत रू. १,२८,४५,०००/- |
| हस्तगत मालमत्ता | :- | अंदाजे १२०० ग्रॅम वजनाच्या एकुण २१७ पिवळया धातूच्या कमी-जास्त लांबीच्या गोलाकार कांडया. |
| आरोपी अटक व दिनांक | :- | विरसिंग मंगलसिंग राजपुत, वय ३७ वर्षे<br>अटक दिनांक - दि.२२/०७/२०२५ |

**तपास कौशल्य :-** नमूद गुन्ह्यातील तपासा दरम्यान पाहिजे आरोपीताचा शोध घेत असतांना, आरोपीताचा प्राप्त मोबाईल क्रमांक यावरुन तपास करीत असतांना आरोपीताने मोबाईल बंद केला असल्याचे दिसून आले.

सदर आरोपीताबाबत तपास पथकाने अथक प्रयत्न करून गुन्हयातील पाहिजे आरोपीत इसम हा त्याचे नातेवाईक यांचे घरी जावून लपला असल्याची खात्रीलायक माहिती अनुभव व तपास कौशल्याने प्राप्त करून पाहिजे आरोपी हा मिरा रोड परिसरातून पळ काढेल या अगोदरच शिताफिने सापळा रचून त्यास ताब्यात घेवून अटक केली.

गुन्हयातील आरोपीतास अटक करून त्याचेकडे कसून तपास करून त्याने एकुण १,३०० ग्रॅम मालमत्तेपैकी १,२०० ग्रॅम वजनाची मालमत्ता निवेदन पंचनाम्यांतर्गत हस्तगत करण्यात तपास पथकास यश प्राप्त झाले आहे.

**पायधुनी पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. अभिजीत अशोक शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री. सचिन दत्तू लहामगे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. ०५०३४८ | इमरान अहमदअली मुल्ला | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र.०६०३७० | संदिप भिकाजी पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. १३०२८८ | लिंबाजी ज्ञानोबा इथापे | प्रशस्तीपत्रक |

<table>
<tr><td>०२</td><td>साकीनाका पोलीस ठाणे,<br>परिमंडळ-१०, मुंबई</td><td><u>गु.र.क्र.</u> २९६/२०२५ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ कलम ८(सी) r/w २२(सी), ९(अ) r/w २५(अ), २९ सह भारतीय न्याय संहिता कलम १११.</td></tr>
</table>

**“ <u>आर्थिक लाभाकरीता संगनमत करून अंमली पदार्थाची निर्मीती करून साठवणुक, ताब्यात ठेवूण विक्री करणे</u>.”**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :- नमुद गुन्हयात यातील फिर्यादी हे पोलीस पथकासह पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विकणारे व खाणारे यांचेवर कारवाई करण्यासाठी गस्त करीत असताना सुलभ शौचालयाच्या बाजुला, रेतीवाला कंपाऊंड, सेंट ज्युड सर्कल, काजुपाडा, साकीनाका, मुंबई या ठिकाणी अटक आरोपी नामे सादिक शेख हा स्वत:चे ताब्यात ५३ ग्रॅम वजनाचा आंतरराष्ट्रीय किंमत अंदाजे १०,०७,०००/ रुपये किंमतीचा ‘एम.डी.(मेफेड्रोन)’ हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशिररित्या बाळगले स्थितीत असताना मिळुन आला वगैरे तक्रारीवरुन गुन्हा दाखल असे म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्री. नितीन उत्तम खैरमोडे/पो.ह.क्र ०१२७६, वय ४३ |
| हस्तगत माल | :- | सर्व मुद्देमालाची एकुण किंमत ४३४,०९,११,२००/ रु (अमली पदार्थ) |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) सादिक सलिम शेख, वय २८<br>२) सिराज सुलतान पंजवानी, वय ५७<br>३) सय्यद अहमद सय्यद रजा फहामी, वय ३८<br>४) सलीम इम्तीयाज शेख उर्फ सलीम लंगडा वय-४५<br>५) फिरोज मउला शेख, वय २८<br>६) महफुज अली सयद, वय २१<br>७) शेख मोहम्मद आदिल मोहम्मद जुबेर, वय<br>८) नुर उल्ला शरीफ उर्फ अजमल हुसेन शरीफ, ४८<br>अटक दिनांक - **दि.२६/०७/२०२५** |

**तपास कौशल्य :-** सदर गुन्ह्यात नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पाहिजे आरोपी नामे सलीम इम्तीयाज शेख उर्फ सलीम लंगडा वय-४५ वर्ष, रा. रुम नं-५१, राहुल नगर, कृष्णचंद्र मार्ग, बांद्रा रेक्लेमेशन, बांद्रा प. मुंबई यास दिनांक २५/०७/२०२५ रोजी अटक करून त्याचेकडे केले तपासामध्ये त्याने एमडी हा अंमली पदार्थ **म्हैसुर, राज्य कर्नाटक** येथुन देखील खरेदी केल्याचे सांगितले. त्याआधारे तांत्रिक विश्लेषण व सदर ठिकाणी जावुन कौशल्यपुर्वक, गोपनीय तपास करून म्हैसुर शहराजवळील एमडी बनविण्याऱ्या कारखान्यावर छापा टाकण्यात आला. तसेच म्हैसुर, राज्य- कर्नाटक येथुन अटक करून आरोपीकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामध्ये दिनांक ३०/०७/२०२५ रोजी आरोपीने त्याचेकडे पाहिजे आरोपीने ठेवण्यासाठी दिलेले एमडी ड्रग्ज व एमडी बनविण्याचे केमिकल असे **शॉप क्रमांक ९, प्रथमेश गॅलेक्सी, हिरांनदानी, पवई, मुंबई** येथे ठेवल्याचे सांगितल्याने नमुद ठिकाणी छापा मारला असता सदर शॉपमध्ये रंगाचे गोडाउनचे आड एमडी व एमडी बनविण्यासाठी लागणारी रसायने यांचा साठा केलेला मिळुन आला. अशाप्रकारे आजपावेतो नमुद गुन्ह्याचे तपासामध्ये एकुण २१४ किलो वजनाचा एमडी हा अंमली पदार्थ व एमडी बनविण्यासाठी लागणारे साहित्य आणि केमिकल असे मिळुन ४३४ कोटी रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

## साकीनाका पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. दयानंद काशिनाथ वणवे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री.पंकज रामधन परदेशी | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र.०३११४६ | चंद्रकांत शामराव पवार | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र.०१२७६ | नितीन उत्तम खैरमोडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र.१३००८१ | अनिल पांडुरंग करांडे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ११/०९/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ''**BEST CONVICTION OF THE MONTH**" माहे जुलै २०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

**(ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुलै २०२५ — ०१ गुन्हा**

| | | |
|---|---|---|
| ०१ | साकीनाका पोलीस ठाणे, परिमंडळ-१०, मुंबई. | गुरक्र व कलमः- २५८/२०१७, कलम ३७६(२)(I), ३७६(२)(N),३४२,५०६(२) भादवि सह कलम ४,६,८,१२ पोक्सो अधि. २०१२ |

**-: '' अल्पवयीन मुली सोबत शारिरीक संभोग करून लैगिक छळवणूक करणे. '':-**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :- नमुद गुन्हयात यातील मयत इसम नामे तन्वीर मोहम्मद आफताब शेख, यांनी आरोपीताला वर्कशॉपमध्ये झोपण्यास व राहू देण्यास प्रतिबंध करूंन कपडेलत्ते घेवुन निघुन जाण्यास सांगितले याचा राग मनामध्ये धरुन आरोपीने त्याच्याकडील धारधार मोठया कात्रीने झोपलेल्या स्थितीत असणाऱ्या मयत तन्वीर मोहम्मद आफताब शेख,याच्या छातीत भोकसुन व तळहातावर व डाव्या दंडावर वार करून दुखापत करून त्यास जीवे ठार मारले आहे.म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | कुमारी अलफियाबी इस्तियाक अली शेख, वय १६ |
| बळीत | :- | कुमारी अलफियाबी इस्तियाक अली शेख, वय १६ |
| निकाल दिनांक | :- | दि. ०५/०७/२०२५ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :- | वाजीद हारूण शेख , वय ४३<br>अटक दिनांक १३/०५/२०१७ |
| दोषसिध्दीचा तपशील | :- | मा. सत्र न्यायाधीश, श्री डी.जी ढोबळे कोर्ट नं. ०२, दिडोंशी, मुंबई यांनी दिनांक ०५/०७/२०२५ रोजी खालील प्रमाणे शिक्षा ठोठावली आहे.<br>०१. कलम ३७६(२)(द), भादवि १० वर्षांचा कठोर कारावास आणि ५०,००० रु दंड. दंड न भरल्यास ६ महिन्यांचा अतिरिक्त कठोर कारावास.<br>०२. कलम ५०६(२) भादवि २ वर्षांचा कठोर कारावास आणि ५,०० रुपये दंड. दंड भरल्यास १ महिन्यांचा अतिरिक्त कठोर कारावास. |

**तपास कौशल्य** :- यातील तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा योग्य तो तपास पूर्ण करून विहीत वेळेत मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. गुन्हयाच्या न्यायालयीन सुनावणीच्या प्रक्रियेच्या वेळी व्यक्तीः लक्ष ठेवून मा. न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे साक्षीदार, पंच, दस्तऐवज मा. न्यायालयात हजर ठेवण्याची प्रमुख भूमिका बजावली. मा. न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या समन्स तातडीने बजावणी करून साक्षीदारांना उपस्थित ठेवले व त्याचे फलस्वरूप नमूद गुन्हयामध्ये मा. न्यायालयाने आरोपीला शिक्षा ठोठावलेली आहे.

तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री.गणेश गंगाराम अंधे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री.विकास नामदेव लोखंडे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सफौ क्र. ३१६०६ | सुनिल केशव पवार | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. ०८१७१२ | किशोर उत्तम गुरूखेल | प्रशस्तीपत्रक |
| ५ | मपोशि.क्र ०९३६१५ | तब्बसुम रफिक बागवान | प्रशस्तीपत्रक |

टिप:— वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, पायधुनी व साकीनाका पोलीस ठाणे Best Detection of the Month July 2025 तसेच साकीनाका पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की Best Conviction of the Month July 2025 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month)करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>a) गेलेला माल<br>b) जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>a) घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅंग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |

| | | |
|---|---|---|
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **F.I.R** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2025 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2025